[विशेष–ध. आ. (मुं. सा. वि.) २-म.

74

सत्यमेव जयते

# नोंदणीचे प्रमाणपत्र

याद्वारे प्रमाणपत्र देण्यात येते की, खाली वर्णन केलेली सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था ही आज, मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० (सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक २९) या अन्वये पुणे विभाग, पुणे येथील सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नोंदणी कार्यालयात योग्य रीतीने नोंदण्यात आलेली आहे.

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचे नाव "सृजन फाऊंडेशन" मि.न.1/0114, S/0088, राधेय निवास, देहूगाव, शिवाजी चौक ता. हवेली जि. पुणे-412 109

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांच्या नोंदणी पुस्तकातील क्रमांक F-50158 (P).

श्री विकास दशरथ केंद यांस प्रमाणपत्र दिले.

आज दिनांक 7/3/२०18 रोजी माझ्या सहीनिशी दिले.

शिक्का

Asst. Charity Commissioner, Pune

सही 07/03/18

पदनाम सहाय्यक धर्मादाय आयुक्त
पुणे विभाग, पुणे

शा.फो.झिं.मु.,पुणे-सीए-१९८/(५०० पुस्तके)१०-१३

[विशेष-घ. आ. (मुं. सा. वि.) ५०-म.

No. 37112

सत्यमेव जयते

# नोंदणी प्रमाणपत्र

**संस्था नोंदणी अधिनियम, १८६०**

(१८६० चा अधिनियम, २१)

**नोंदणी क्रमांक** महा./ 1033/2017/पुणे
दिनांक 25/7/2017/पुणे

याद्वारे असे प्रमाणित करण्यात येते की, "सृजन फाऊंडेशन"

मि.नं. 1/0118, 5/0088, राधेय निवास

खालील तारखेस संस्था नोंदणी अधिनियम, १८६० (सन १८६० चा अधिनियम, २१) अन्वये

देहूगाव, शिवाजी चौक, ता. हवेली, जि. पुणे.

योग्यरित्या नोंदणी करण्यात आली.

25/7/2017 श्री. विकास दशरथ 412109

तारीख :- / /२० रोजी माझ्या सहीनिशी दिले. केद

25/7/17

संस्थांचे सहायक निबंधक,

सहाय्यक संस्था निबंधक

पुणे विभाग, पुणे विभाग.

Asstt. Registrar of Society
Pune Region, Pune

# परिशिष्ट - "अ"

प्रति,
सहाय्यक संस्था निबंधक
पुणे विभाग, पुणे

**विषय** :- **संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणीबाबत.**

**संस्थेचे नांव** :- सृजन फाऊंडेशन

**संस्थेचा पत्ता** :- द्वारा: श्री. सुनिल बाळसाहेब कंद
मि.नं.१/०११८ व ५/००८८, राधेय निवास, देहुगांव,
शिवाजी चौक, ता.हवेली, जि.पुणे - ४१२ १०९

महोदय,

निवेदन करण्यात येते की, विषयात नमुद केलेल्या संस्थेची नोंदणी संस्था अधिनियम १८६० प्रमाणे करावयाची आहे. सबब आपणाकडे कागदपत्र सादर करण्यात येत आहेत.

(1) विधानपत्र (ज्ञापन) मेमोरॅन्डम ऑफ असोसिएशन.

(2) नियम व नियमावलीची सत्य प्रत.

(3) संस्था नोंदणी संदर्भात कार्यकारी मंडळाच्या सर्व सभासदांची संमतीपत्र.

(4) संस्था नोंदणीबाबत कार्यकारी मंडळाच्या सर्व सभासदांच्या सहीनीशी अधिकारपत्र.

(5) संस्थेच्या पत्त्याबाबत व मालमत्तेबाबत अध्यक्ष वा सचिव यांचे प्रतिज्ञापत्र रु. १००/- च्या स्टॅम्पपेपरवर रु. १२०/- कोर्ट फी स्टॅम्पसह.

पुढे असेही निवेदन करण्यात येते की, वरील संस्थेचे सर्व उद्देश सन १८६० च्या संस्था नोंदणी अधिनियमाच्या कलम २० अन्वये असुन वरील संस्थेच्या नांवाची वा नामासदृश्य असलेली अन्य संस्था माझ्या माहितीप्रमाणे अस्तित्वात नाही. नोंदणी शुल्क रु. ५०/- (रु.पन्नास फक्त) भरण्यास तयार आहे. तरी वरील संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये त्वरीत नोंदवावी अशी विनंती आहे.

आपला,
विकासकंद
( श्री. विकास दशरथ कंद )

4/7/2017

# परिशिष्ट - "अ"

प्रति,
सहाय्यक संस्था निबंधक
पुणे विभाग, पुणे

**विषय** :- **संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणीबाबत.**

**संस्थेचे नांव** :- सृजन फाऊंडेशन

**संस्थेचा पत्ता** :- द्वारा: श्री. सुनिल बाळसाहेब कंद
मि.नं.१/०११८ व ५/००८८,राधेय निवास,देहुगांव,
शिवाजी चौक, ता.हवेली,जि.पुणे - ४१२ १०९

महोदय,

निवेदन करण्यात येते की, विषयात नमुद केलेल्या संस्थेची नोंदणी संस्था अधिनियम १८६० प्रमाणे करावयाची आहे. सबब आपणाकडे कागदपत्र सादर करण्यात येत आहेत.

(1) विधानपत्र (ज्ञापन) मेमोरॅन्डम ऑफ असोसिएशन.

(2) नियम व नियमावलीची सत्य प्रत.

(3) संस्था नोंदणी संदर्भात कार्यकारी मंडळाच्या सर्व सभासदांची संमतीपत्र.

(4) संस्था नोंदणीबाबत कार्यकारी मंडळाच्या सर्व सभासदांच्या सहीनीशी अधिकारपत्र.

(5) संस्थेच्या पत्त्याबाबत व मालमत्तेबाबत अध्यक्ष वा सचिव यांचे प्रतिज्ञापत्र रु. १००/- च्या स्टॅम्पपेपरवर रु. १२०/- कोर्ट फी स्टॅम्पसह.

पुढे असेही निवेदन करण्यात येते की, वरील संस्थेचे सर्व उद्देश सन १८६० च्या संस्था नोंदणी अधिनियमाच्या कलम २० अन्वये असुन वरील संस्थेच्या नांवाची वा नामासदृश्य असलेली अन्य संस्था माझ्या माहितीप्रमाणे अस्तित्वात नाही. नोंदणी शुल्क रु. ५०/- (रु.पन्नास फक्त) भरण्यास तयार आहे. तरी वरील संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये त्वरीत नोंदवावी अशी विनंती आहे.

आपला,
विकास कंद

4/7/2017

( श्री. विकास दशरथ कंद )

अर्ज क्र.2354/17 कलम
अर्जदाराचे नांव :- ॲड अभिजीत पिंगळे
नक्कलेचा अर्ज आला तो दिनांक 26/7/17
नक्कल तयार दि.:- 27/7/17
नक्कल दिली तो दि.:-
27/7/17
अधीक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी
कार्यालय पुणे विभाग पुणे

महा./ 1033 /2017/पुणे
दिनांक 25/7/2017/पुणे
सहाय्यक संस्था निबंधक
पुणे विभाग, पुणे

# परिशिष्ट - "ब"

## ज्ञापन

## सृजन फाऊंडेशन

मि.नं.१/०११८,५/००८८,राधेय निवास,देहुगांव,शिवाजी चौक,ता.हवेली,जि.पुणे - ४१२ १०९

***********************************************************************

(1) **संस्थेचे नांव** :- सृजन फाऊंडेशन

(2) **संस्थेचा कार्यालयाचा पत्ता** :- द्वाराः श्री. सुनिल बाळासाहेब कंद
मि.नं.१/०११८,५/००८८,राधेय निवास,देहुगांव,
शिवाजी चौक,ता.हवेली,जि.पुणे - ४१२ १०९

(3) **संस्थेचे ध्येय व उदेश**

१. संस्थेमार्फत समाजाच्या उन्नतीसाठी व प्रगतीसाठी विविध सामाजिक व शैक्षणिक कार्यक्रम पार पाडणे. समाजाचा सर्वांगीण सामाजिक विकास करणे. पर्यावरण व स्वच्छता यांकडे विशेष लक्ष पुरविणे.

२. इंग्रजी व मराठी माध्यमाच्या शाळा सुरु करणे. त्यामध्ये नर्सरी (सिनिअर व ज्युनिअर केजी) अंगणवाडी, बालवाडी, पूर्वप्राथमिक, माध्यमिक, उच्चमाध्यमिक, महाविद्यालय, उच्च शिक्षण इ. व सर्व प्रकारचे शिक्षण की ज्याचा विद्यार्थ्यांना त्यांच्या भावी आयुष्यात उपयोग होईल. असे मार्गदर्शनपर शिक्षण देणे. सर्व स्तरावरील निवासी व अनिवासी विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक उपक्रम सुरु करणे. अंध, अपंग, मुकबधिर, कर्णबधिर, मतीमंद यांच्यासाठी शाळा सुरु करणे.

३. विविध क्रीडाविषयक उपक्रम घेणे. विविध क्रीडा स्पर्धा आयोजित करणे व पार पाडणे. उदा. मल्लखांब, कबड्डी, खो खो, हॉली बॉल, फुट बॉल इ. तसेच आधुनिक साहित्य सामुग्रीनेयुक्त अशी अदयावत व्यायामशाळा व जलतरण तलाव युवकांसाठी सुरु करणे. क्रीडा विकासास चालना देणे.

४. लोकांसाठी वाचनालय व ग्रंथालय सुरु करणे .

५. गरीब, होतकरु, हुशार मुलांसाठी शालेय साहित्यांचे वाटप करणे. उदा. वहया, पुस्तके, कपडे, शैक्षणिक साहित्य इत्यादी तसेच हुशार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देणे. तसेच अत्यंत गरीब व आर्थिकदृष्टया मागास विद्यार्थ्यांना दत्तक घेऊन वार्षिक शालेय खर्च करणे व इतर मदत देणे.

| ( श्री. सुनिल बाळासाहेब कंद ) | ( श्री. अशोक बाळासाहेब कंद ) | ( श्री. विकास दशरथ कंद ) |
|---|---|---|
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |

(5)

६. ग्रामीण शेतकरी बांधवांसाठी शेतीतंत्राची अत्याधुनिक माहिती व नविन तंत्रज्ञान याबाबत माहिती पुरविणे. शेतीविषयक व्याख्याने आयोजित करणे. चर्चासत्र, परिसंवाद, कार्यशाळा, शिबिर, मेळावे, प्रदर्शन इ. आयोजित करणे. शेतीतज्ञांचे मार्गदर्शन शेतकऱ्यांना मिळवून देणे. बि-बियाणे, खते, जंतुनाशके, औषधे, अवजारे, मशागतीच्या पध्दती, पिक, संरक्षण, धान्यसाठवण इ. विषयी सखोल माहिती व ज्ञान उपलब्ध करुन देणे.

७. संस्थेमार्फत विविध सामाजिक व जनहितोपयोगाची कामे करणे. सुशिक्षित महिला व युवकांना रोजगार देणे कामी मार्गदर्शन करणे. तसेच समाजातील दुर्बल घटकांना कायदे विषयक ज्ञान उपलब्ध करुन देणे. विविध योजना लोकांपर्यंत पोहचविणे.

८. समाजातील गोरगरीब लोकांसाठी वैद्यकीय उपचार उपलब्ध व्हावेत म्हणुन सार्वजनिक हॉस्पिटलची निर्मिती करणे. तसेच शहरी व ग्रामीण भागात आरोग्य सुधारण्यासाठी वैद्यकीय शिबिरे घेणे. तज्ज्ञ डॉक्टर बोलावून गरजू लोकांना मदत करणे. लॅबरोटेरीज सुरु करणे. रुग्ण लोकांना भेटी देणे.

९. संस्थेमार्फत परिसराचा सामाजिक विकास करणे. स्वच्छता अभियान कार्यक्रम सुरु करणे. परिसरात वृक्षारोपन करणे. पर्यावरण समतोल राखणे. पर्यावरणाविषयी जनजागृती करणे. वनीकरणाच्या माध्यमातून प्रदूषण मुक्त वातावरण निर्माण करणे.

१०. मुला मुलींसाठी वसतीगृह सुरु करणे. तसेच वयोवृध्द, शारिरीकदृष्टया अपंग असलेल्या व्यक्तींसाठी सर्वोतोपरी मदत व सहकार्य करणे.

११. स्थानिक परिसरातील जनता व पालकांच्या विविध समस्या शांततेच्या मार्गाने सोडविणे कामी मदत व मार्गदर्शन करणे.

१२. विविध सामाजिक कार्यक्रम घेणे उदा. व्यसनमुक्ती, एडस् निर्मुलन, वृक्षारोपण, सामाजिक वनीकरण, स्त्री आधार, माता व बालसंगोपन , वृध्दाश्रम, साक्षरता अभियान, प्रौढ साक्षरता वर्ग, कुटुंबनियोजन व आरोग्यशिबिर, रक्तदान व नेत्रदान शिबिर, मोफत चष्मे वाटप, ब्लड बँक, नारी समता मंच, अध्यात्मिक केंद्र सामुदायिक विवाह सोहळा, युवकांसाठी स्वयंरोजगार योजनेसंबंधी मार्गदर्शन, नवविवाहीत दाम्पंत्यांना मार्गदर्शन, गर्भ संस्कार शिबिर व मार्गदर्शन इत्यादी.

१३. ग्रामीण, शहरी, दुर्गम, डोंगराळ व आदिवासी भागातील गावात/पाडयात सामाजिक, शैक्षणिक व सामाजिक विकासाचे विविध प्रकल्प/योजना कामी मार्गदर्शन व मदत

| | | |
|---|---|---|
| (श्री. सुनिल बाळासाहेब कंद) | (श्री. अशोक बाळासाहेब कंद) | (श्री. विकास दशरथ कंद) |
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |

Asst. Charity Commissioner, Pune

(5)

Asst. Charity Commissioner Pune

करणे. शेती विषयक संशोधन प्रकल्प हाती घेणे. तसेच ग्रामीण भागात उर्जा निर्मिती व बायोगॅस व त्यावरील व्यवसाय निर्मिती करुन देण्याबाबत सखोल मार्गदर्शन, सहाय्य व मदत करणे.

१४. आधुनिक शेती, शेतकरी प्रशिक्षण योजना सुरु करणे. नोंदणीकृत शेती विषयक काम करणाऱ्या सेवाभावी संस्थांना तांत्रिक मार्गदर्शन करणे वृक्षलागवड, वृक्षसंवर्धन, जलसंवर्धन, वन्यजीव संवर्धन इत्यादी उपक्रम हाती घेणे. शेतकऱ्यांसाठी व त्यांच्या हितासाठी उदयोग व्यवसाय व प्रशिक्षण शिबिर वेळोवेळी आयोजित करुन शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणे.तसेच शेती व शेती पूरक मालाचे उत्पादन प्रक्रिया व विक्री संबंधी शेतकऱ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करणे.

१५. दुष्काळ, पूर, भुकंप, आग, युध्द, वादळ, मोठी शस्त्रक्रिया इत्यादी आपत्तीत सापडलेल्या आपादग्रस्तांना सर्वतोपरी मदत व सहकार्य करणे. तसेच मानव निर्मित सकंटात सापडलेल्या कुटुंबियांचे तातडीने व दिर्घमुदतीचे पुनर्वसन करणे. त्यासाठी मार्गदर्शन करणे. आपत्ती व्यवस्थापन विषयक कामे करणे.

१६. शेतकऱ्यांना शेतीपूरक व्यवसायाची माहिती उपलब्ध करुन देणे. उदा. दुग्धव्यवसाय, मत्स्यशेती, वराहपालन, मधमाशीपालन, कुक्कुटपालन, शेळी मेंढी पालन इ. उपक्रमा बाबत व यासंबधीत शैक्षणिक कोर्सेस घेणे. गोशाळा पालन उपक्रम राबविणे.

१७. महिलांसाठी विविध कल्याणकारी उपक्रम सुरु करणे. त्यामध्ये भरतकाम, विणकाम, शिवणकाम, संगणक, हॉटेल मॅनेजमेंट, पाककला उदयोग प्रशिक्षण, खादय पदार्थ निर्मिती, फॅशन डिझायनर, संस्कार वर्ग, ब्युटी पार्लरचे कोर्सेस, हेल्थ क्लब, मेहंदी, रांगोळी, चित्रकला, हस्तकला, सिरॅमिक, पेन्टींग इत्यादींचे कोर्सेस/प्रशिक्षण वर्ग आयोजित करुन महिलांना प्रशिक्षित करणे.व विविध उपक्रमातून महिला सक्षम कार्यक्रम करणे. तसेच महिलांमध्ये उदयोजकता वाढीस चालना देणे.

१८. महिलांना स्वावलंबी बनविण्याकरिता त्यांना घरगुती व्यवसायाचे प्रशिक्षण माहिती व मार्गदर्शन करणे. तसेच बेरोजगार तरुणांना नोकरी विषयक किंवा व्यवसाय विषयक मार्गदर्शन करुन त्यांना रोजगार उपलब्ध करण्या विषयी माहिती पुरविणे.

१९. ग्रामीण भागातील गरीब महिलांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी त्यांच्यामध्ये सुप्त कला गुणांना चालना देऊन क्षमता विकास करणे. ग्रामीण विकास या विषयी संपूर्ण माहिती महिलांना प्रशिक्षणाच्या माध्यमातून पुरविणे. ग्रामीण विकास या विषयी संपूर्ण माहिती ही महिलांना प्रशिक्षणाच्या माध्यमातून पुरविणे.

| ( श्री. सुनिल बाळासाहेब कंद ) | ( श्री. अशोक बाळासाहेब कंद ) | ( श्री. विकास दशरथ कंद ) |
|---|---|---|
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |

२०. लहान मुलांसाठी बालसंगोपन, बालसदन व पाळणाघर सुरु करणे. आश्रमशाळा व अनाथाश्रम सुरु करणे. निराधार महिलांना आधार देण्यासाठी महिला निराधार आश्रम स्थापन करणे व महिलांना स्वयंरोजगार उपलब्ध करुन देणे कामी मार्गदर्शन करणे.

२१. वृध्दांसाठी वृध्दाश्रम सुरु करणे. वृध्दाश्रमात वृध्दांची अन्न, वस्त्र, निवारा व औषधोपचार यांची सोय करणे व त्यांना समाजात मानाने जगण्यासाठी प्रयत्न करणे.

२२. अनाथ, निराधार मुलामुलीं करीता अनाथाश्रम सुरु करणे. त्यात त्याचे संगोपन, पालन पोषण, शिक्षण,अन्न, वस्त्र, निवारा, वैद्यकीय मदत, आवश्यक वस्तू इत्यादी सोयी सुविधा उपलब्ध करुन देणे. मतीमंद मुलांची शाळा सुरु करणे.

२३. जनतेत समाजसेवेची जाणीव निर्माण करणे.

२४. मुलामुलींसाठी विविध स्पर्धांचे आयोजन व प्रयोजन करणे. उदा. निबंध, वकृत्व, गायन, अंताक्षरी, मेहंदी, रांगोळी, नृत्य, चित्रकला, हस्तकला, काव्यवाचन इत्यादी व मुलांना उत्तेजनार्थ बक्षिसे व स्मृतिचिन्ह देणे.

२५. समाजातील मान्यवर, थोर, कर्तुत्वान व क्रिडा, लेखन व सामाजिक क्षेत्रातील लोकांचे आदर्श विचार जनतेपर्यंत पोहचविणे. त्यासाठी व्याख्यानमाला, चर्चासत्र, परिसंवाद, कार्यशाळा, मेळावे, प्रवचन इत्यादी आयोजित करणे.

२६. महिलांसाठी घरगुती उदयोगांसंबंधी मार्गदर्शन व प्रशिक्षण देणे.तसेच युवकांना नवनविन उदयोगांसबंधी मार्गदर्शन व प्रशिक्षण देणे.

२७. संस्थेमार्फत विविध सांस्कृतिक कार्यक्रम व पारंपारिक सण व उत्सव साजरे करणे तसेच राष्ट्रीय सण साजरे करणे. उदा. सार्वजनिक गणेशोत्सव व नवरात्रोत्सव, शिवजयंती, दहीहंडी इत्यादी.

२८. अनाथ, अपंग, वृध्द, विधवा, निराधार, नैसर्गिकपिढीत लोकांना सर्वतोपरी सहाय्य व मदत करणे. गोरगरीबांसाठी मोबाईल/फिरता दवाखाना सुरु करणे.

२९. समाजातील गोरगरीब लोकांसाठी वैद्यकीय उपचार उपलब्ध व्हावेत म्हणून सार्वजनिक इस्पितळाची निर्मिती करणे. हेल्थ सेंटर सुरु करणे.

| ( श्री. सुनिल बाळासाहेब कंद ) | ( श्री. अशोक बाळासाहेब कंद ) | ( श्री. विकास दशरथ कंद ) |
|---|---|---|
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |

Asst. Charity Commissioner Pune

(४)

Asst. Charity Commissioner Pune

३०. संस्थेमार्फत टेक्निकल, मॅनेजमेंट इन्स्टिटयुट सुरु करणे. त्यात विद्यार्थ्यांना यांत्रिक, तांत्रिक, औद्योगिक विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करणे. त्यासाठी प्रशिक्षण वर्ग घेणे व त्यात विविध कोर्सेस उपलब्ध करुन देणे. उदा. व्होकेशनल टेक्निकल, इलेक्ट्रॉनिक्स, टेलरिंग, भरतकाम, रेडीओ, फॅन, टेलिफोन, मिक्सर, ग्राईंडर, मोबाईल दुरुस्ती, वॉशिंग मशिन, टेपरेकॉर्डर, फ्रीज, एअरकंडीशन दुरुस्ती, वाहन व इलेक्ट्रीक दुरुस्ती कोर्स स्क्रीन प्रिटींग इन्स्टिटयुट व तसेच ब्युटीपार्लरचे प्रशिक्षण देणे. संगणक प्रशिक्षण, फॅशन डिझायनिंग, आर्ट व क्राफ्ट प्रशिक्षण इत्यादी.

३१. व्यावसायिक शिक्षण, संगणक शिक्षण, तांत्रिक शिक्षण, यांत्रिक शिक्षण, अध्यापक विद्यालय (डी.एड.व बी.एड.कॉलेज ), व्यवस्थापन महाविद्यालय, अभियांत्रिकी महाविद्यालय, संगीत,कला व क्रीडा प्रशिक्षण, वैदयकीय शिक्षण, आयुर्वेदीक शिक्षण, योगा प्रशिक्षण वर्ग, कमांडो प्रशिक्षण, सौर उर्जा शिक्षण, कृषी विद्यालय, कायदयाचे शिक्षण, अध्यात्मिक शिक्षण, पॉलिटेकनिक व आर्किटेक शिक्षण, औद्योगिक प्रशिक्षण, विविध व्यवसाय प्रशिक्षण, इंजिनिअरिंगच्या सर्व शाखेचे कोर्सेस D फार्मसी, B फार्मसी, B P Ed M डिग्री कोर्सेस, नर्सिंग कोर्सेस, इलेक्ट्रॉनिक, इलेक्ट्रीक कोर्सेस सौर उर्जा प्रशिक्षण, स्पर्धा परीक्षा कोर्सेस, एम.पी.एस.सी. व यु.पी.एस.सी. संबंधी मार्गदर्शन इतर सर्व प्रकारचे शिक्षण विद्यार्थ्यांना त्यांच्या भावी आयुष्यात उपयोग होईल असे मार्गदर्शनपर शिक्षण देण्यासाठी जरुर ते सर्वप्रकारचे प्रयत्न करणे. तसेच वनीकरण, पर्यावरण व पर्यावरणासाठी असलेल्या इतर बाबींचे कार्य करणे.

३२. कायदयाच्या चौकटीत बसतील असे व वरील उद्देशास पूरक असे धर्मादाय स्वरुपाचे उपक्रम ना-नफा ना-तोटा तत्वावर संस्थेमार्फत यशस्विरित्या पार पाडणे.

(4) संस्थेच्या नियम व नियमावलीप्रमाणे ज्या कार्यकारी मंडळावर संस्थेची व्यवस्था सोपविण्यात आलेली आहे. अशा पहिल्या कार्यकारी मंडळाच्या सभासदांची नांवे, पत्ते, राष्ट्रीयत्व, वय, व्यवसाय व हुद्दा हे पुढील प्रमाणे राहील.

| अ.क्र. | नांव व पत्ता | वय | राष्ट्रीयत्व | हुद्दा | व्यवसाय |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | श्री. सुनिल बाळासाहेब कंद<br>मि.नं.१/०११८,५/००८८,राधेय निवास,<br>देहुगांव, शिवाजी चौक, ता.हवेली,<br>जि.पुणे - ४१२ १०९ | ४८ | भारतीय | अध्यक्ष | नोकरी |

( श्री. सुनिल बाळासाहेब कंद ) ( श्री. अशोक बाळासाहेब कंद ) ( श्री. विकास दशरथ कंद )

अध्यक्ष उपाध्यक्ष सचिव

(8)

Asst. Charity Commissioner Pune

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| २. | श्री. अशोक बाळासाहेब कंद<br>मि.नं.१/०११८,५/००८८,राधेय निवास,<br>देहुगांव, शिवाजी चौक, ता.हवेली,<br>जि.पुणे - ४१२ १०९ | ४५ | भारतीय | उपाध्यक्ष | धंदा |
| ३. | श्री. विकास दशरथ कंद<br>मि.नं.१/०११८,५/००८८,राधेय निवास,<br>देहुगांव, शिवाजी चौक, ता.हवेली,<br>जि.पुणे - ४१२ १०९ | ३२ | भारतीय | सचिव | नोकरी |
| ४. | श्री. दशरथ बाळासाहेब कंद<br>मि.नं.१/०११८,५/००८८,राधेय निवास,<br>देहुगांव, शिवाजी चौक, ता.हवेली,<br>जि.पुणे - ४१२ १०९ | ५८ | भारतीय | खजिनदार | शेती |
| ५. | सौ. वर्षा संपत शेटे<br>मु. नवलाख उंबरे, ता.मावळ,<br>जि.पुणे - ४१० ५०७ | ३० | भारतीय | सदस्य | गृहीणी |
| ६. | श्री. सोमेश जयवंत दाभाडे<br>तळेगांव चाकण रोड,इंदोरी (माळवाडी),<br>ता.मावळ,जि.पुणे - ४१० ५०७ | २५ | भारतीय | सदस्य | नोकरी |
| ७. | श्री. प्रशांत भागुजी काळोखे<br>प्राथमिक शाळे समोर,विठ्ठलवाडी,<br>देहुगांव,ता.हवेली,जि.पुणे-४१२ १०९ | ३० | भारतीय | सदस्य | शेती |
| ८. | कु. कोमल सुनिल कंद<br>मि.नं.१/०११८,५/००८८,राधेय निवास,<br>देहुगांव, शिवाजी चौक, ता.हवेली,<br>जि.पुणे - ४१२ १०९ | २१ | भारतीय | सदस्य | शिक्षण |
| ९. | श्री. सौरभ सुनिल कंद<br>मि.नं.१/०११८,५/००८८,राधेय निवास,<br>देहुगांव, शिवाजी चौक, ता.हवेली,<br>जि.पुणे - ४१२ १०९ | १९ | भारतीय | सदस्य | शिक्षण |

| ( श्री. सुनिल बाळासाहेब कंद ) | ( श्री. अशोक बाळासाहेब कंद ) | ( श्री. विकास दशरथ कंद ) |
|---|---|---|
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |

(9)

Asst. Charity Commissioner Pune

(5) आम्ही खालील सहया करणारे **"सृजन फाऊंडेशन"** संस्थेचे सदस्य जाहिर करतो की, संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये अभिप्रेत केलेली संस्था अस्तित्वात आणण्याची आमची इच्छा असुन वरील उद्देशाने आम्ही एकत्र येऊन **" सृजन फाऊंडेशन "** ही संस्था आज दिनांक 08/06/2016 रोजी स्थापन केली असुन ती संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी करण्यासाठी आम्ही या विधानपत्रावर सहया केल्या आहेत.

| | नांव | सहया |
|---|---|---|
| १. | श्री. सुनिल बाळासाहेब कंद | |
| २. | श्री. अशोक बाळासाहेब कंद | |
| ३. | श्री. विकास दशरथ कंद | |
| ४. | श्री. दशरथ बाळासाहेब कंद | |
| ५. | सौ. वर्षा संपत शेटे | |
| ६. | श्री. सोमेश जयवंत दाभाडे | |
| ७. | श्री. प्रशांत भागुजी काळोखे | |
| ८. | कु. कोमल सुनिल कंद | |
| ९. | श्री. सौरभ सुनिल कंद | |

वरील लोकांनी माझ्या समोर सहया केल्या आहेत व त्या सर्वाच्या सहया मी ओळखतो.

स्थळ : पुणे

दिनांक : 08/06/2016

Adv. Satish M. Pingale
En.No.: MAH /31/1996
S. No. 136/2/2, Tuljai Sadan
Shri Siddhivinayak Colony
Warje Malwadi, Pune- 58
Mob. No. 9822261494

**" दाखला "**

आम्ही खाली सहया करणार प्रतिज्ञापूर्व सांगतो की, आमच्या माहिती प्रमाणे **" सृजन फाऊंडेशन", मि.नं.१/०११८, ५/००८८, राधेय निवास, देहुगांव, शिवाजी चौक, ता.हवेली, जि.पुणे - ४१२ १०९,** या नांवाची किंवा त्यासारख्या नांवाची दुसरी संस्था तालुका हवेली व पुणे जिल्हयात अस्तित्वात नाही. किंवा नोंदली गेली नाही.

| (श्री. सुनिल बाळासाहेब कंद) | (श्री. अशोक बाळासाहेब कंद) | (श्री. विकास दशरथ कंद) |
|---|---|---|
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |

 (10)

महा./ 1033/2017/पुणे
दिनांक 25/7/2017/पुणे
सहाय्यक संस्था निबंधक
पुणे विभाग, पुणे

Asst. Charity Commissioner Pune

# परिशिष्ट - "क"

## नियम व नियमावली

## सृजन फाऊंडेशन

मि.नं.१/०११८,५/००८८,राधेय निवास,देहुगांव,शिवाजी चौक,ता.हवेली,जि.पुणे - ४१२ १०९

**************************************************************************

**(1) संदर्भीय शब्दांची व्याख्या :-**

1. **संस्था** :- संस्था म्हणजे मेमोरॅन्डम ऑफ असोसिएशन (ज्ञापन) मध्ये नमुद केलेल्या नावाची संस्था.

2. **उद्देश** :- ज्ञापनातील कलम ३ खाली येणारे संस्थेचे उद्देश.

3. **सभासद** :- संस्थेचा सभासद म्हणजे नियम नियमावलीनुसार प्रवेश दिलेली व्यक्ती व जिने आपल्या सदस्यत्वाची वर्गणी दिली आहे.

4. **संस्था नोंदणी अधिनियम** :- संस्था नोंदणी अधिनियम म्हणजे सन १८६० च्या भारत सरकारचा कायदा व त्याखाली येणारे नियम या संस्थेस लागु आहेत.

5. **कार्यकारी मंडळ** :- संस्थेचे कार्यकारी मंडळ म्हणजे संचालक समिती, गव्हर्निंग कौन्सिल, विश्वस्त किंवा इतर मंडळ ज्यांच्याकडे संस्थेचे नियम नियमावलीनुसार व्यवस्थापन सोपविले आहे असे मंडळ.

**(2) संस्थेचे कार्यक्षेत्र :-**

या संस्थेचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र असे राहील.

**(3) हिशोबाचे वर्ष :-**

या संस्थेचे हिशोबाचे वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च असे राहील.

**(4) सभासदत्व :-**

या संस्थेचे ध्येय धोरण व उद्देशांची आवड असलेल्या १८ वर्ष वयाच्या पुढील व्यक्तीस सभासद होता येईल. सभासद होऊ इच्छिणाऱ्या व्यक्तीने वर्गणी भरुन संस्थेचा अर्ज २ सभासदांच्या शिफारशीसह अध्यक्षांकडे शिफारशीकरीता पाठविला पाहिजे. व त्यास कार्यकारी मंडळाकडून मंजुरी मिळाल्यानंतर अर्जदार व्यक्तीस सभासदाचे अधिकार प्राप्त होतील. नामंजुर केलेले अर्ज येणाऱ्या वार्षिक व सर्वसाधारण सभेपुढे अंतिम मंजुरीसाठी ठेवले जातील.

| ( श्री. सुनिल बाळासाहेब कंद ) | ( श्री. अशोक बाळासाहेब कंद ) | ( श्री. विकास दशरथ कंद ) |
|---|---|---|
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |

(11)

Asst. Charity Commissioner Pune

**(5) सभासदांचे प्रकार :-**

**1. संस्थापक सभासद :-**

संस्थेच्या स्थापनेच्या वेळी ९ जे संस्थेचे समासद होते व ज्या ९ जणांनी ज्ञापनावर सहया केल्या आहेत, अशा ९ समारादांना संस्थापक सभासद समजण्यात येईल. त्यांच्या कडून वार्षिक वर्गणी रु. १०१/- घेतली जाईल.

**2. सर्वसाधारण सभासद :-**

वार्षिक वर्गणी रु. १०१/- देणाऱ्या सभासदास सर्वसाधारण सभासद समजण्यात येईल.त्याचेकडून रु. ११/- प्रवेश फी घेण्यात येईल.

**6 सभासद रद्द होणे :-**

1. सभासद निधन पावल्यास त्या सभासदाचे सभासदत्व रद्द केले जाईल.
2. सभासदाचा राजीनामा कार्यकारी मंडळाने मंजुर केल्यास त्या सभासदाचे सभासदत्व रद्द केले जाईल. तसेच गैरवर्तन व समाजास दिशामूल करुन निधी जमा करणाऱ्या सभासदास काढून टाकण्यात येईल.
3. सभासदास फौजदारी व नैतिक अधःपाताच्या गुन्हयाबद्दल शिक्षा झालेली असल्यास अगर सभासदाने संस्थेचे नियम, उद्देश व हित यांना प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष विघातक कृत्य केले असल्यास त्या सभासदास आपली बाजू मांडण्याची संधी दिली जाईल. व त्यानंतरच त्याचे सभासदत्व रद्द केले जाईल.
4. वर्ष सुरु झाले नंतर संस्थेची वर्गणी तीन महिन्यात न दिल्यास त्या सभासदाचे सभासदत्व रद्द केले जाईल.
5. सभासद जर संस्थेच्या व्यवहारात किंवा कारभारात व्यत्यय आणून संस्थेची हानी करत असेल तर त्याचे सभासदत्व ठराव करुन रद्द केले जाईल.
6. सभासदास शारिरीक, मानसिक दुर्बलता येवुन तो अकार्यक्षम ठरला तर त्याचे सभासदत्व रद्द केले जाईल.
7. जर एखादा सभासद कायमचा परदेशात वास्तव्यासाठी गेल्यास त्याचे सभासदत्व रद्द केले जाईल.
8. जर एखादा सभासद संस्थेच्या होणाऱ्या तीन सलग सभांना गैरहजर राहिल्यास त्याचे सभासदत्व रद्द केले जाईल. तसेच कार्यकारणीचा कालावधी संपल्यानंतर सभासदाचे सभासदत्व आपोआप रद्द होईल.

**(7) सर्वसाधारण सभा व तिचे अधिकार आणि कार्ये :-**

1. संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे वर्ष संपल्यापासून चार महिन्यात घेतली पाहिजे. कोणत्याही परिस्थितीत वार्षिक सभा वर्ष संपल्यापासून सहा महिन्यात झाली नाही तर ३/५ सभासदांनी एकत्रित येऊन अशी सभा घेण्याबद्दल योग्य तो निर्णय घेऊ शकतील आणि त्यानुसार होणारे सभेतील ठराव मंडळावर बंधनकारक राहतील.

| ( श्री. सुनिल बाळासाहेब कंद ) | ( श्री. अशोक बाळासाहेब कंद ) | ( श्री. विकास दशरथ कंद ) |
|---|---|---|
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |

2. मागील सभेचा वृत्तांत, कार्यकारी मंडळाने सादर केलेला जमाखर्च, ताळेबंद, अंदाजपत्रक तयार करणे.
3. कार्यकारी मंडळाची निवड करणे किंवा निवडणुकीचे निकाल जाहिर करणे.
4. पुढील वर्षासाठी चार्टर्ड अकौटट अगर पब्लिक ट्रस्ट ऑडीटर नेमणे.
5. नियम व नियमावलीतील दुरुस्ती असल्यास त्यास मान्यता देणे.
6. ध्येय, धोरण व कार्य यांची चर्चा करणे.
7. अध्यक्षांच्या परवानगीने येणारी व इतर सभासदांनी अगोदर नोटीस देऊन सभेपुढे आणलेली कामे करणे.
8. संस्थेमार्फत आवश्यक ते पोटनियम करणे व त्यांना कार्यकारी मंडळाची संमती घेऊन त्यासंबंधी योग्य ते ठराव पास करणे.

## (8) सर्वसाधारण सभेची सुचना व गणसंख्या :-

1. कार्यकारी मंडळाने ठरविलेल्या दिवशी, वेळी व ठिकाणी सभा भरविण्यात येईल.
2. वार्षिक सभेची नोटीस सभेपुर्वी १८ दिवस अगोदर दिली पाहिजे.
3. नियम व नियमावलीतील दुरुस्ती असेल तर त्याची नोटीस कमीत कमी १५ दिवस अगोदर दिली पाहिजे.
4. वार्षिक सभेची नोटीस स्थानिंक वर्तमान पत्रातून दिल्यास उत्तम पण ही गोष्ट बंधनकारक राहणार नाही.
5. सभेची नोटीस प्रत्येक सभासदास पोस्टाने अथवा सही घेऊन देण्यात येईल. तथापी बाहेर गावच्या एखाद्या सभासदास सभेची नोटीस स्पीड पोस्ट किंवा रजिस्टर ए. डी. ने पाठवुनही न मिळाल्यामुळे सदर सभेत मंजुर झालेल्या कामकाजास त्याची बाधा येणार नाही.
6. संस्थेला खरोखरी उपयोगी होतील अशा व्यक्तींना निमंत्रित व निरिक्षक म्हणुन कार्यकारी मंडळाच्या सभेत मंजुरी घेऊन बोलाविता येईल पण त्यांना संस्थेच्या मतदानात भाग घेता येणार नाही.
7. सभेला कोरम पटावरील सभासद संस्थेच्या तीन पंचमांश एवढा राहील. पण कोरम अभावी तहकुब झालेली सभा लगेच अर्ध्या तासाने बोलाविली जाईल. त्यास कोरमची आवश्यकता असणार नाही व तिचे सर्व कामकाज कायदेशीर राहील पण वार्षिक सभेच्या नोटीसीत तशी सुचना असणे आवश्यक आहे.

## (9) विशेष सर्वसाधारण सभा :-

कार्यकारी मंडळास सर्व सभासदापुढे एखादी महत्वाची गोष्ट ठेवावयाची असल्यास अगर एखाद्या विशेष प्रसंगी विशेष सर्व साधारण सभा घेता येईल. त्यावेळी वार्षिक सर्व साधारण सभेचे सर्व नियम पाळले जातील. तसेच पटावरील तीन पंचमांश समासदांनी लेखी अर्ज केल्यास जादा सर्वसाधारणसभा अध्यक्षांनी बोलाविली पाहिजे.

| ( श्री. सुनिल बाळासाहेब कंद ) | ( श्री. अशोक बाळासाहेब कंद ) | ( श्री. विकास दशरथ कंद ) |
|---|---|---|
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |

Asst. Charity Commissioner
Pune

17



## (10) कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी व त्यांची रचना :-

1. सध्या एकंदर सभासदांचे कार्यकारी मंडळ राहील. त्यात अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, खजिनदार, हे ४ पदाधिकारी व ५ सभासद राहातील. पदाधिकारी हे कार्यकारी मंडळातूनच निवडले जातील. आवश्यकता भासल्यास ज्यादा पदाधिकारी निर्माण करण्यात येतील. किंवा कमी करण्यात येतील.
2. संस्थेच्या कार्यकारी मंडळात कमीत कमी ७ व जास्तीत जास्त १५ व्यक्ती असु शकतील.

## (11) कार्यकारी मंडळाचा कार्यकाल व निवडणुकीची पध्दत :-

कार्यकारी मंडळाचा कार्यकाल हा ५ वर्षाचा राहील. दर ५ वर्षानी संस्थेची एकुण मतदार यादी तयार करुन वार्षिक सर्वसाधारण सभा बोलाविण्यात येईल व अशा सभेत वार्षिक सर्वसाधारण सभेचे सभासद नविन कार्यकारी मंडळाची निवड लोकशाही पध्दतीने किंवा बहुमताने करतील. जुन्या कार्यकारी मंडळाकडून ही निवड केली जाईल. निवडणुक होण्यापूर्वी एक महिना अगोदर सभासदांची यादी संस्थेच्या कार्यालयात प्रसिध्द केली जाईल. ज्या सभासदांनी आपली वर्गणीची रक्कम पुर्णपणे भरलेली आहे असेच सभासद निवडणुकीत भाग घेण्यास पात्र ठरतील. समसमान मते पडल्यास अध्यक्ष आपल्या पसंतीचे मत (कास्टींग वोट) देतील.

## (12) कार्यकारी मंडळातील पदाधिकारी व त्यांची कार्ये :-

अ. **अध्यक्ष :-**

1. वार्षिक सर्वसाधारण सभा, जादा सर्वसाधारण सभा व कार्यकारी मंडळातील सभेचे अध्यक्षस्थान स्विकारुन निःपक्षपणे सभा पार पाडणे.
2. समान मत विभागणी झाल्यास निर्णायक जादा मत देणे.
3. संस्थेच्या एकुण कामकाजावर नियमित देखरेख व नियंत्रण ठेवणे.
4. सचिव यांनी संस्थेचे कामकाज सुरळीत व नियमित पार पाडले नाहीतर स्वतःच्या अधिकारात कार्यकारी मंडळाची वार्षिक सभा बोलावणे.
5. संस्थेच्या कागदपत्रावर सहया करणे.
6. अंतिम आदेश जारी करणे.

ब. **उपाध्यक्ष :-**

अध्यक्षांच्या अनुपस्थितीत अध्यक्षांची सर्व कामे करणे व इतर वेळी अध्यक्षांना त्यांच्या दैनंदिन कामकाजात मदत करणे.

| ( श्री. सुनिल बाळासाहेब कंद ) | ( श्री. अशोक बाळासाहेब कंद ) | ( श्री. विकास दशरथ कंद ) |
|---|---|---|
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |

Asst. Charity Commissioner
Pune



ड. **सचिव -** :-

1. संस्थेच्या ध्येय धोरणानुसार व कार्यकारी मंडळाच्या सुचने नुसार संस्थेचे दैनंदिन कामकाज पहाणे.
2. संस्थेसाठी पत्रव्यवहार करणे व दप्तर सांभाळणे.
3. वेळच्या वेळी कार्यकारी मंडळाच्या व संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभा अध्यक्षांच्या पूर्व परवानगीने बोलावणे.
4. कार्यकारी मंडळ व नोकरवर्ग यांचा दुवा म्हणुन संबंध ठेवणे व त्यांच्या दैनंदिन कामावर देखरेख ठेवणे व संस्थेचा कायदेशीर प्रतिनिधी म्हणुन काम पहाणे.

इ. **खजिनदार** :-

1. संस्थेचे दैनंदिन व वार्षिक जमाखर्चाचे कागदपत्र ठेवणे.
2. सभासदांची वर्गणी, देणगी, व्याज, कर्ज येणे रक्कम जमा करुन सर्वाची मान्य बिले अध्यक्षांच्या व कार्यकारी मंडळाच्या मान्यतेनुसार चुकती करणे.
3. मासिक व वार्षिक अंदाजपत्रक तयार करुन कार्यकारी मंडळापुढे ठेवणे.
4. हिशोबाच्या संबंधी चोपडया, पावती बुके, चेक्स व पासबुके यांची जबाबदारी पुर्णपणे खजिनदारावर राहील.
5. संस्थेने ठेवलेल्या बॅंकेत नियमित जमा होणारी रक्कम जमा करणे व त्या अनुषंगाने येणारी सर्व कामे करणे.
6. खजिनदारास दैनंदिन खर्चासाठी रु.५००/- रोख शिल्लक ठेवता येईल.
7. संस्थेची वार्षिक हिशोब विवरणपत्रे म्हणजेच ऑडीट रिपोर्ट दरवर्षी मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालय, पुणे- १, यांच्याकडे नियमितपणे दाखल करणे.

फ. **सदस्य** :-

1. संस्थेच्या होणाऱ्या सभेला उपस्थित राहणे.
2. संस्थेच्या प्रत्येक कामात मदत करणे.

**(13) कार्यकारी मंडळाच्या सभा व मागणीची सभा** :-

1. कार्यकारी मंडळाची सभा दर ३ महिन्यातून एक वेळा बोलाविली पाहिजे. अध्यक्षांच्या गैरहजेरीत सचिव समेचे काम पहातील. कार्यकारी मंडळाचा सभासद पूर्व परवानगी शिवाय सतत ३ समेत गैरहजर राहिल्यास त्याचे कार्यकारी मंडळावरील सभासदत्व रद्द केले जाईल. पुढील सभेत बहुमताने सदर ठराव मंजुर करण्यात येईल.

2. कार्यकारी मंडळाच्या ३/५ सभासदांनी लेखी अर्ज केल्यास कार्यकारी मंडळाची सभा अध्यक्षांनी बोलाविली पाहिजे. अध्यक्षांनी एक महिन्याचे आत अशी सभा घेतली नाहीतर सभा मागणी करणारे सभासद सभा बोलावू शकतील. त्यावेळी कार्यकारी मंडळाच्या सभेचे सर्व नियम पाळले जातील.

| ( श्री. सुनिल बाळासाहेब कंद ) | ( श्री. अशोक बाळासाहेब कंद ) | ( श्री. विकास दशरथ कंद ) |
|---|---|---|
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |

Asst. Charity Commissioner Pune



## (14) कार्यकारी मंडळाच्या सभेची सूचना व गणसंख्या :-

सभासदांना सभेपूर्वी सात दिवस अगोदर नोटीस पाठवणे आवश्यक आहे. पण तशाच प्रसंगी अध्यक्षांस फक्त एक दिवसाची समक्ष सही घेवून नोटीस देवुन तातडीने सभा बोलावण्याचा अधिकार राहील.पोस्टाने वेळेवर स्पीड पोस्ट किवा रजिस्टर ए. डी.ने पाठवलेली नोटीस एखादया सभासदास मिळाली नाहीतर त्यामुळे बोलावलेली सभा बेकायदेशीर ठरणार नाही. विशेष प्रसंगी वेळेच्या अभावी एखादया तातडीच्या कामासाठी निर्णय घेणे झाल्यास सचिव हा अध्यक्षांच्या परवानगीने कार्यकारणीच्या सभासदाकडे लेखी मत मागवुन घेईल व मताधिक्यावरुन तो ठराव अगर निर्णय संमत वा असंमत झाला असे समजण्यात येईल. कार्यकारी मंडळाच्या सभेत ३/५ चा कोरम असावा पण कोरम अभावी तहकुब झालेली सभा लगेच अर्ध्या तासाने बोलाविली जाईल. त्यास कोरमची आवश्यकता असणार नाही. सभेचा कोरम ३/५ राहील.

## (15) कार्यकारी मंडळाच्या निवडणुकीचे नियम :-

1. जुन्या कार्यकारणीतील निवडणुकीस इच्छुक नसणाऱ्या सभासदास निवडणूक अधिकारी म्हणून नेमले जाईल. जुनी कार्यकारणी त्याकरीता नियम तयार करेल. व निवडणुकीचा निकाल जाहिर करतील.
2. ज्या वर्षी निवडणूक असेल त्या वर्षीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा नोटीसीमध्ये तसा स्पष्ट उल्लेख करण्यात येईल व उमेदवारी अर्ज मागविण्यात येतील.
3. कार्यकारी मंडळाची निवडणुक वार्षिक सर्वसाधारण सभेत उपस्थित सभासदांच्या मधुन लोकशाही पध्दतीने किंवा निवडणुक पध्दतीने मतदान होईल.

## (16) कार्यकारी मंडळातील रिक्त पद भरण्याबाबत :-

मृत, राजीनामा अगर अन्य कारणाने कार्यकारी मंडळातील पद रिक्त झाल्यास कार्यकारी मंडळातील राहीलेले अन्य सदस्य बहुमताने उर्वरित काळाकरीता ते पद भरतील व तसा बदल अर्ज विहीत नमुन्यात मे. सहाय्यक धर्मादाय आयुक्त साहेब पुणे क्षेत्र यांना सादर करतील.

## (17) कार्यकारी मंडळाचे कार्य व अधिकार :-

1. संस्थेचे दैनंदिन कामकाज पहाणे, नोकर वर्गाची नेमणुक करणे, वेतन, विमा, प्राव्हिडंट फंड, बोनस, सेवानिवृत्ती करणे व इतर गोष्टींबाबत नियम करणे. संस्थेच्या देण्याघेण्याचे व्यवहार पहाणे, नविन समित्या उपसमित्या नेमणे या संस्थेच्या ध्येय धोरणानुसार इतर कामे करणे.

| ( श्री. सुनिल बाळासाहेब कंद ) | ( श्री. अशोक बाळासाहेब कंद ) | ( श्री. विकास दशरथ कंद ) |
|---|---|---|
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |

2. हिशेब तपासणीसाकडून जमाखर्च व ताळेबंदपत्रक तयार करुन तसेच अहवाल तयार करुन घेवुन वार्षिक सभा घेणे. सभेचे हिशेब सन १८६० च्या संस्था नोंवणी अधिनियमातील तरतुदीनुसार ठेवुन त्याचे परीक्षण चार्टडअकौटंट अगर पब्लिक ट्रस्ट ऑडीटर कडून करुन घेवुन विहीत नमुन्यामध्ये मे. सहाय्यक संस्था निबंधक साहेब पुणे क्षेत्र यांचेकडे दरवर्षी ठराविक मुदतीत पाठवणेची तजवीज करावी.
3. सरकारकडून अगर स्थानिक अधिकाऱ्याकडून सोपविलेले आवश्यक कार्य करणे. उद. संग्रहालयाची देखभाल करणे.
4. पुढील कार्याची दिशा अंदाजपत्रक तयार करुन वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे ठेवणे.
5. संस्थेचे देण्याघेण्याचे व्यवहार पहाणे, शाखा प्रमुख नेमणे, त्यांचे कार्य, अधिकार व कालावधी ठरविणे व निर्माण केलेल्या समित्या / पदे रद्द करणे व या संस्थेच्या ध्येय धोरणानुसार इतर कामे करणे.
6. संस्थेच्या नियम व नियमावलीतील दुरुस्ती, नविन कार्य अगर इतर शिफारशीसह वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे ठेवणे.
7. वार्षिक सभेने केलेले ठराव, आदेश व धोरण विषयी गोष्टी अंमलात आणणे.
8. संस्थेने नेमलेल्या व्यक्तींची संबंधीत माहिती तसेच विवरणे सन १८६० च्या संस्था नोंदणी नियम क्रंमाक ८ अन्वये अनुसुची २ मध्ये नमुन्यात मे. सहाय्यक संस्था निबंधक साहेब पुणे क्षेत्र यांचेकडे दरवर्षी पाठविण्यात येईल.
9. संस्थेतर्फे कायदेशीर कारवाई करणे, प्रतिनिधी नियुक्त करणे, वकील वगैरे नियुक्त करणे व इतर आवश्यक खर्च करणे.

## (18) संस्थेचा निधी, मिळकत व विनीयोग :-

संस्थेचा निधी वाढविण्यासाठी देशी व परदेशी देणग्या गोळा करता येतील. अन्य कायदेशीर मार्गाने निधी गोळा करता येईल.तसेच सरकारी, निमसरकारी, खाजगी, अनुदान,समासदांची वर्गणी या प्रकाराचा उपयोग करावा. कार्यकारी मंडळास मान्य असलेल्या अटीवर देणग्या व मदत स्विकारता येईल. संस्थेच्या निधीचा विनियोग हा संस्थेच्या उद्देशा करीताच केला जाईल. यापुढे देणगी, वर्गणी, भेटवस्तू, अनुदान, बक्षिसे, खरेदी, संपादित केलेली मिळकत ही संस्थेची मिळकत म्हणुन समजण्यात येईल.

## (19) कर्ज किंवा ठेवी यासंबंधी तरतुद :-

संस्थेस कायदेशीर मार्गाने कर्ज घेता येईल मात्र त्यापुर्वी मु. सा. वि. व्य. १९५० चे कलम ३६ व ३५ प्रमाणे मे. धर्मादाय सह आयुक्त, पुणे यांची रितसर पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. तसेच ठेवी अथवा बिनव्याजी ठेवी स्विकारता येतील.

| ( श्री. सुनिल बाळासाहेब कंद ) | ( श्री. अशोक बाळासाहेब कंद ) | ( श्री. विकास दशरथ कंद ) |
|---|---|---|
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |

(12)

Asst. Charity Commissioner
Pune

## (20) स्थावर मालमत्ता खरेदी विक्री करण्याबाबतची तरतुद :-

संस्थेस योग्य वाटल्यास स्थावर मिळकत खरेदी करता येईल. मात्र स्थावर मिळकतीची विक्री करावयाची असल्यास अथवा गहाण, तबदील करण्याची असल्यास मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था १९५० चे कलम ३६ अन्वये मे. धर्मादाय सह आयुक्त, पुणे यांची रितसर परवानगी घेणे आवश्यक आहे.

## (21) बँक खाते :-

संस्थेजवळ शिल्लक असलेली रक्कम कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेत किंवा मान्यता असलेल्या शेड्युल बँकेत किंवा सहकारी बँकेत संस्थेच्या नांवाने ठेवता येईल. सदरील बँक खाते हे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सचिव या तिघांपैकी कोणाच्याही संयुक्त सहीने चालवता येईल. अध्यक्षांची सही कायम राहील. संस्थेची रोख रक्कम रुपये ९०९/- ही सुरुवातीचा निधी (कॉरपस) बँकेत खाते उघडल्यानंतर ते बँकेच्या खात्यावर जमा करावेत व तेथुन पुढे संस्थेचे आर्थिक व्यवहार सुरु करावे.

## (22) सभासदांची यादी ठेवण्याची पध्दत :-

१८६० चे संस्था नोंदणी अधिनियम कलम १५ अनुसार संस्थेचे जे सभासद असतील त्यांची एक यादी १९७१ चे संस्था नोंदणी महाराष्ट्र नियमातील नियम १५ प्रमाणे अनुसुची सहाचे नमुन्यात ठेवण्यता येईल.

१८६० चे संस्था नोंदणी अधिनियमातील कलम ४ प्रमाणे व १९७१ चे संस्था नोंदणी महाराष्ट्र नियम ७प्रमाणे दरवर्षी कार्यकारी मंडळाची यादी अनुसुची एकच्या नमुन्यात आपल्या विभागाचे सहाय्यक संस्था निबंधकांच्या कार्यालयात पाठवावी लागेल.

१८६० चे संस्था नोंदणी अधिनियमातील कलम - अ प्रमाणे १९७१ चे संस्था नोंदणी महाराष्ट्र नियम ८ प्रमाणे दरवर्षी संस्थेत नोकरी लावलेल्या व्यक्तींच्या नोकरी संबंधी अटी बाबतचे विवरण अनुसुची दोनच्या नमुन्यात आपल्या विभागाचे सहाय्यक संस्था निबंधकांच्या कार्यालयात पाठवावी लागेल.

## (23) नियम व नियमावलीतील बदल करण्याबाबतची तरतुद :-

कार्यकारी मंडळाने अगर सभासदांनी चालु नियम नियमावलीमध्ये दुरुस्ती सुचवली असेल तर वार्षिक सर्वसाधारण सभेत उपस्थित सभासदांच्या ३/५ बहुमताने मंजुर करण्यात येईल. पण त्यास कार्यकारी मंडळाची संमती असणे आवश्यक आहे. मात्र घटना दुरुस्तीचा मसुदा प्रत्येक सभासदाला नोटीसी बरोबर पाठविला पाहिजे.

| ( श्री. सुनिल बाळासाहेब कंद ) | ( श्री. अशोक बाळासाहेब कंद ) | ( श्री. विकास दशरथ कंद ) |
|---|---|---|
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |